राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांचे डिजिटल उपकेंद्र अंधेरी या ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्ती/ नुतनीकरणाच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याबाबत..

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्रमांक मराग्रं-२०२४/प्र.क्र.३६/ई-७३६६७४/ग्रं.क.
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.

दिनांक : ११ फेब्रुवारी, २०२६.

वाचा : १) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३४/दुरुस्ती-नुतनीकरण अंधेरी/२०२४-२५/५३१३, दि.२५.१०.२०२४
२) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३४/डिजीटल उपकेंद्र अंधेरी/२०२५-२६/२४९१, दि.०१.०८.२०२५
३) ग्रंथालय संचालनालयाचे पत्र क्र.३४/डिजीटल उपकेंद्र अंधेरी/२०२५-२६/४५९३, दि.११.११.२०२५

प्रस्तावना :

राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांचे डिजिटल उपकेंद्र अंधेरी या ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्ती / नुतनीकरणाच्या कामास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यासाठी ग्रंथालय संचालक,ग्रंथालय संचालनालय,महाराष्ट्र राज्य यांनी संदर्भीय पत्रांन्वये प्रस्ताव सादर केला आहे.

२. राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांचे डिजिटल उपकेंद्र, अंधेरी या ग्रंथालयाच्या इमारत नुतनीकरण / दुरुस्तीसाठी रु.१,२२,००,०४५/- इतक्या निधीच्या अंदाजपत्रकास मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांनी आणि अधिक्षक अभियंता, मुंबई प्रादेशिक (विद्युत) मंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी तांत्रिक सहमती दिली आहे. त्यानुसार,सदर कामासाठी रु.१,२२,००,०४५/- (अक्षरी रुपये एक कोटी बावीस लक्ष पंचेचाळीस फक्त) इतक्या निधीच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :-

राज्य मध्यवर्ती ग्रंथालयांचे डिजिटल उपकेंद्र अंधेरी या ग्रंथालयाच्या इमारतीच्या दुरुस्ती / नुतनीकरणाच्या रु.१,२२,००,०४५/- (अक्षरी रुपये एक कोटी बावीस लक्ष पंचेचाळीस फक्त) इतक्या निधीच्या अंदाजपत्रकास खालील अटींच्या अधीन राहून प्रशासकीय व वित्तीय मान्यता प्रदान करण्यात येत आहे. : -

१) प्रत्यक्ष काम करताना प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च होणार नाही याबाबतची दक्षता ग्रंथालय संचालनालयाने घ्यावी.

२) प्रत्यक्ष कामास सुरुवात करताना आवश्यक त्या मान्यता घेऊनच काम हाती घ्यावे.

३) ढोबळ स्वरुपात धरण्यात आलेल्या तरतूदीबाबत काम करतेवेळी विस्तृत अंदाजपत्रके मंजूर करुनच काम हाती घ्यावे.

४) प्रस्तावातील खरेदीशी संबंधित बाबींकरिता ई-निविदा प्रणालीचा अवलंब करुन उद्योग, ऊर्जा व कामगार विभागाच्या दि.२४.०८.२०१७ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

५) सदर काम हेरिटेज इमारती अंतर्गत येत असल्यास त्यास संबंधितांचे ना-हरकत प्रमाणपत्र घेणे आवश्यक राहील.

२. सदर कामासाठी येणारा खर्च मागणी क्र.एच-८, लेखाशिर्ष ४२०२, शिक्षण, क्रीडा, कला व संस्कृती यावरील भांडवली खर्च, १०५, सार्वजनिक ग्रंथालये (००) (०१) मोठी बांधकामे (कार्यक्रम) (४२०२ ०४८२) ५३- मोठी बांधकामे या लेखाशिर्षांतर्गत अर्थसंकल्पित तरतुदीतून भागविण्यात यावा.

३. सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्याशिवाय प्रत्यक्ष कामास सुरुवात करु नये. निधी उपलब्धतेच्या अनुषंगाने ग्रंथालय संचालनालयाने आवश्यक कार्यवाही करावी.

४. सदर शासन निर्णय हा वित्त विभाग शासन निर्णय क्र.विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/ विनियम, भाग-२, दि.२०.०९.२०१९ च्या शासन निर्णयातील भाग एक उपविभाग-५ परि.क्र. १३४(१), १३४(२) आणि १३४(३) नुसार तसेच शासन परिपत्रक सार्वजनिक बांधकाम विभाग क्रमांक संकिर्ण-२०१९/प्र.क्र.१०/इमा-२, दि.२५.०९.२०१९ मधील परि.४ मधील तरतुदीस अनुसरुन प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०२१११८१२५५४६०८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

AJIT TATOBA KUNDLE

Digitally signed by AJIT TATOBA KUNDLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HIGHER AND TECHNICAL EDUCATION DEPARTMENT, 2.5.4.20=e8d77478a97d2485b55f7fc94d7932346a883cbe88fedf8ca544b731a7db9fb6, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=4865016DE0AB999E5364A36B2DA1F9AD227B8C0EB513CD7E59305D7539B1F9CA, cn=AJIT TATOBA KUNDLE
Date: 2026.02.11 18:14:00 +05'30'

(अ.ता.कुंडले)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति :-

१. मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
२. मा.राज्यमंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३. अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
४. अपर मुख्य सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई
५. अपर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.
६. अपर मुख्य सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई
७. महालेखापाल - १/२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखापरीक्षा), मुंबई/नागपूर.

८. मुख्य अभियंता, सार्वजनिक प्रादेशिक विभाग, मुंबई उपनगर, मुंबई
९. ग्रंथालय संचालक, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१०. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, मुंबई उपनगर
११. कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, मुंबई उपनगर
१२. ग्रंथपाल, वर्ग-१, राज्य मध्यवर्ती ग्रंथालय, नगर भवन, मुंबई
१३. निवडनस्ती, ग्रंथालय कक्ष, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.